## महानगर दंडाधिकारी यांचे ६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. /पीएस/२०

गुन्हा क्रमांक – 866/2023

नि.क्र.

१. अपराध घडल्याचा दिनांक :- 13/11/23

२. अपराध नोंदविण्याचा दिनांक :- 13/11/23

३. फिर्यादीचे नांव व पत्ता :- सरकार तर्फे सहा. पोलीस निरीक्षक,

**पोलीस ठाणे :** कस्तुरबा मार्ग

४. **आरोपीचे नांव, वय व पत्ता** :- राकेश श्रीनाथ पवार

वय – 41 वर्षे,

रा. कांदिवली पूर्व, मुंबई.

५. **आरोपाचा आशय** :-

दिनांक 13/11/23 रोजी, रात्री 13.00 वाजताचे सुमारास सार्ई दर्शन चाळ, गांधी रोड 2, कांदिवली प., मुंबई येथे आपण विनापरवाना फटाका स्टॉल लावून स्फोटक पदार्थ बाळगुन सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना ठेवुन शासकीय आदेशाची अवज्ञा केली आणि याद्वारे आपण भारतीय दंड संहिताचे कलम १८८ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपण फटाका स्टॉल लावून स्फोटक पदार्थ बाळगले आणि याद्वारे आपण भारतीय दंड संहिताचे कलम २८६ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपण सार्वजनिक ठिकाणी फटाका स्टॉल लावून स्फोटक पदार्थ बाळगून लोकांचे जीवीतास पोहोचणारे संभाव्य धोक्यापासुन सुरक्षित राहण्याची कोणतीही काळजी न घेता इतरांची व स्वतःची सुरक्षितता धोक्यात येईल असे वर्तन करताना मिळून आले आणि याद्वारे आपण भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपण सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना फटाका स्टॉल लावून स्फोटक पदार्थ बाळगून लोकांचे जीवीतास पोहोचणारे संभाव्य धोक्यापासुन सुरक्षित राहण्याची कोणतीही काळजी न घेता इतरांची व स्वतःची सुरक्षितता धोक्यात

...०२/-

येईल असे वर्तन करताना मिळून आले आणि याद्वारे आपण महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ३३ सह १३१ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

**आरोपीचे निवेदन :-**

प्र. १ : तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्र. २ : तुम्ही वकील नियुक्त केले आहे काय ?

उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला विधी सहाय्यता पाहिजे काय?

उत्तर : नाही.

प्र. ४ : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला आरोपाचा आशय समजला काय?

उत्तर : होय.

प्र. ५ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय, मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

--------------------------

समक्ष

**(एस. एम. ए. सय्यद)**
महानगर दंडाधिकारी
६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई

दिनांक :

**नि. १ वर आदेश.**

आरोपीने स्वतःहुन त्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्याने त्याची कमीत कमी दंडावर मुक्तता करण्यात यावी अशी या न्यायालयास विनंती केली आहे. मी आरोपीला त्याचेवर कोणाचा

दबाव आहे काय? व तो स्वतःहुन गुन्हा कबूल करतो आहे काय? अशी विचारणा केली व गुन्हा कबूल केल्यास त्यास शिक्षा होऊ शकते याची कल्पना दिली व त्यास पुर्नविचार करण्याची संधी दिली, परंतू, तो त्याचेवर कोणचाही दबाव नाही व त्याला स्वतःहुन गुन्हा कबूल करावयाचा आहे असे कथन करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी स्वतःहुन गुन्हा कबूल करीत आहे व त्याचेवर कोणाचाही दबाव नाही. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आ दे श :**

१. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम १८८ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/- रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

२. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम २८६ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/- रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

३. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/- रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ३३एच सह १३१ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/- रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला ७ (सात) दिवसाचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

५. जप्त मुद्देमाल फटाके निरुपयोगी असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

६. आरोपीला आदेशाची प्रमाणित प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)

(एस. एम. ए. सय्यद)
महानगर दंडाधिकारी
६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

दिनांक

Paid Rs. 2000/-
Recpt. No. 82209
Head Cashier
Borivali Centre of Courts, Mumbai
8/1/25

M.M. 68th Court Borivali